# पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा लातूर जिल्हा दौरा

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले हे १६ ते १८ सप्टेंबर या तीन दिवसांच्या लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

पालकमंत्री श्री. भोसले यांचे सातारा येथून १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता लातूर जिल्ह्यात आगमन होईल व औसा तालुक्यात अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या क्षेत्राची ते पाहणी करतील. सायंकाळी ६ वाजता त्यांचे लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व मुक्काम करतील.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमांसाठी पालकमंत्री श्री. भोसले यांचे १७ सप्टेंबर रोजी सकाळी ८.४६ वाजता लातूर येथील हुतात्मा स्मारक स्मृतीस्तंभ येथे आगमन होईल. याठिकाणी सकाळी ९ वाजता त्यांच्या हस्ते मुख्य शासकीय राष्ट्रध्वज वंदन होईल. सकाळी १० वाजता लातूर तालुक्यातील निवळी येथे आयोजित मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या जिल्हास्तरीय शुभारंभ कार्यक्रमाला ते उपस्थित राहतील. लातूर शहरातील गंजगोलाई येथे सकाळी ११ वाजता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला पालकमंत्री उपस्थित राहतील. सकाळी ११.४० वाजता त्यांचे लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व राखीव. याच ठिकाणी दुपारी १.४५ वाजता त्यांच्या उपस्थितीत लातूर जिल्ह्यातील गोधन खरेदी विक्री व वाहतुकीबाबत बैठक व त्यानंतर अतिवृष्टीबाबत संबंधित शासकीय विभागांची आढावा बैठक होईल.



पालकमंत्री श्री. भोसले यांच्या उपस्थितीत दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात लातूर जिल्हा नियोजन समितीची बैठक होईल. सायंकाळी ५ ते ५.३० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय येथे राखीव. सायंकाळी ५.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथून उदगीर तालुक्यातील हंडरगुळी (बाजार) कडे प्रयाण करतील. हंडरगुळी येथे उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे सायंकाळी ६.१५ वाजता पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत अनावरण होईल. सायंकाळी ७.४० वाजता हंडरगुळी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष बालाजी विनायकराव भोसले यांच्या निवासस्थानी भेट देतील. त्यानंतर सोयीनुसार लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन व मुक्काम. १८ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता पालकमंत्री श्री. भोसले लातूर शासकीय विश्रामगृह येथे स्थानिक पदाधिकाऱ्यांसमवेत चर्चा करतील. सकाळी १० वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथून साताराकडे प्रयाण करतील.

## 'स्वत:ची काळजी ; स्वत:चे व्यवस्थापन' विषयावर व्याख्यान




**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथे दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी 'स्वत:ची काळजी आणि स्वत:चे व्यवस्थापन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन महाविद्यालयाच्या महिला तक्रार निवारण समिती मार्फत करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून आशा हॉस्पिटल लातूर च्या वैद्यकीय संचालिका डॉ. सोनाली सुरवसे (एम.एस. प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोगशास्त्र तज्ञ) यांनी विशेष उपस्थिती दर्शवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांनी प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन स्वागत केले.या प्रसंगी कार्यक्रमाचे समन्वयक प्रा.प्रियांका इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या व्याख्यानात डॉ. सोनाली सुरवसे यांनी वैयक्तिक आरोग्य व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी दैनंदिन जीवनात योग्य आहार पद्धती, व्यायाम, योगाभ्यास, ध्यान, ताणतणाव नियोजन व वेळेचे व्यवस्थापन या घटकांची आवश्यकता स्पष्ट केली. विशेषत: आधुनिक जीवनशैलीमुळे उद्भवणाऱ्या विविध आजारांवर प्रतिबंधात्मक उपाययोजना कशा कराव्यात याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

स्त्रीआरोग्य आणि आरोग्य समस्या, मासिक पाळी व्यवस्थापन तसेच किशोरवयीन विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी या विषयांवर त्यांनी विशेष प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनातून आरोग्यसंबंधी माहिती दिली. प्राचार्या डॉ. सातपुते यांनी आपल्या भाषणात ''विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाबरोबरच आरोग्याविषयी जागरूक राहणे आवश्यक आहे. शैक्षणिक उपक्रमांसोबतच अशा प्रकारचे मार्गदर्शन कार्यक्रम जीवन घडविण्यासाठी उपयुक्त ठरतात'' असे मत व्यक्त केले.

महाविद्यालयाच्या या उपक्रमा बद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदरावजी सोनवणे, सचिव रमेशजी बियाणी, सहसचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव अजींक्यजी सोनवणे, तसेच कोषाध्यक्ष संजयजी बोरा यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन एम.फार्म ची विद्यार्थिनी मिताली सोनकांबळे हिने केले. या व्याख्यानाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## कबड्डी स्पर्धेत मुलींचा संघ प्रथम

बाभळगाव : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर ( स्वायत्त ) द्वारा आयोजित " अ " विभागीय आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथील मुलींच्या कबड्डी संघाने प्रथम क्रमांक पटकावून विद्यापीठांमध्ये पुढील होणाऱ्या निवड चाचणी स्पर्धेसाठी विद्यापीठ स्तरीय प्रशिक्षणासाठी स्थान निश्चित केले आहे. महाविद्यालयाच्या वतीने यशस्वी संघाची कॅप्टन चौधरी सुरुची, चौधरी अंजली, सुरवसे साक्षी, सपकाळ संध्या, कांबळे कविता, डोंगरी नेहा, खरटमोल किरण, सूर्यवंशी कोमल, धुमाळ अंजली, मस्के रूपाली यांचा ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन तर प्रशिक्षक क्रीडा संचालक डॉ. वैशाली माढेकर, दक्ष अकादमीचे संचालक राजकुमार आंबुलगेकर, बालाजी बामणे, प्रा. शितल खोत, क्रीडा विभाग सल्लागार मंडळातील डॉ. जयदेवी पवार, डॉ. शाहूराज मुळे, डॉ. दशरथ भिसे यांचा सत्कार करण्यात आला. यशस्वी संघाचे अभिनंदन दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव अध्यक्ष मा. आ. धीरज देशमुख, सचिव शाम देशमुख, सर्व संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, स्टाफ सचिव प्रा.चंद्रकांत मोरे, बाळासाहेब देशमुख, डॉ. अभिजित बादाडे, डॉ. महावीर कटके, डॉ. पांडूरंग मुंढे, डॉ. विवेक जाधव, प्रा. विवेक गोस्वामी, नितीन पाटील, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

## लातूरकरांसाठी महिंद्रा लॉजिस्टिकची शाखा सुरू, रीजनल मॅनेजर अमित झा यांच्या हस्ते उद्घाटन

**लातूर/प्रतिनिधी :** पार्सल सेवा क्षेत्रात देशभरात नावाजलेली महिंद्रा लॉजिस्टिक कंपनी आता लातूरकरांच्या सेवेतही दाखल झाली आहे. शहरातील कोयना पावर हाऊस जवळ कंपनीच्या शाखेचे उद्‌टान शनिवार, दि. १३ सप्टेंबर रोजी कंपनीचे रिजनल ऑपरेशन्स मॅनेजर अमित झा यांच्या हस्ते संपन्न झाले.

उद्घाटन प्रसंगी बोलताना अमित झा म्हणाले की, महिंद्रा लॉजिस्टिक कंपनी देशभरामध्ये विश्वासार्ह ट्रान्सपोर्ट सेवा पुरवते. लातूरमध्ये शाखा सुरू झाल्यामुळे लातूरकरांना जलद, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण पार्सल सेवा मिळणार आहे. या नव्या शाखेमुळे व्यापारी, नागरिक आणि उद्योग व्यवसायाला मोठा फायदा होईल. या प्रसंगी लातूरमधील नामांकित उमाटे कुरिअर्सचे रणवीर उमाटे उपस्थित होते. त्यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, महिंद्रा लॉजिस्टिकसोबत मिळून आम्ही लातूरकरांना येत्या काळात अधिकाधिक चांगल्या व जलद सेवा उपलब्ध करून देण्याचा सातत्याने प्रयत्न करणार आहोत.

या उद्घाटन सोहळ्यासाठी कंपनीचे विविध अधिकारी, स्थानिक व्यापारी, ग्राहक तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते. शाखा सुरू झाल्यामुळे लातूर जिल्ह्यातील नागरिक आणि व्यावसायिक यांना देश-भरात विविध ठिकाणी माल व पार्सल पोहोचवणे सोयीस्कर होणार आहे, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



यावेळी संतोष भाऊ नागरगोजे मनसे सरचिटणीस तथा प्रदेशाध्यक्ष मनसे शेतकरी सेना,सचिन शिरसाट मनसे स्वयंरोजगार सरचिटणीस, भास्कर अवताडे शिवसेना शिंदे गट जिल्हा उपाध्यक्ष, व्यापारी भारत बिराजदार,गोविंद शोधले, भाजपा मच्छीमार सेल नेताजी मस्के, व्यंकट चिकुरे,पंकज मोठे, प्रेमनाथ सूर्यवंशी,फारूक शेख, जगन्नाथ एकले, अल्लाबक्स शेख, गोपिका गोरलावार, विशाल गायकवाड स्वामी बनसोडे आधीची उपस्थिती होती.

## जन सुरक्षा कायद्याविरुद्धच्या धरणे आंदोलनात सहभागी व्हा : देडे

**लातूर/प्रतिनिधी :** पावसाळी अधिवेशनात महाराष्ट्र सरकारने सर्व विरोधी पक्ष वसंघटनांना नेस्तनाबूत करण्यासाठी जन सुरक्षा कायदा मंजूर केला आहे. हा कायदा अतिशय घातक स्वरूपाचा असून जन सामान्यांना संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालणार आहे. या जन सुरक्षा कायद्याच्या विरोधात १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती दिनी राष्ट्र सेवा दल व कृत समितीच्या वतीने लातूर येथे महात्मा गांधी चौकात सकाळी ११ वाजता धरणे सत्याग्रह आंदोलन करण्यात येणार आहे. तरी या आंदोलनात विविध पक्ष, संघटनाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्र सेवा दलाचे लातूर जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे यांनी केले आहे. या नव्या व अन्यायी कायद्यामुळे कोणीही सरकारवर टीका करू शकणार नाही, संघटित होऊ शकणार नाही असा हा विचित्र कायदा आहे; राज्य शासनाने कडव्या डाव्या शहरी नक्षलवादाला संपविण्यासाठी म्हणून आणलेला हा कायदा परिवर्तनवादी चळवळीला क्षीण करणार आहे. सर्व परिवर्तनवादी संघटना, दलित संघटना, पुरोगामी संघटना, विचारवंत, लेखक, साहित्यिक व पत्रकार यांनी मोठ्या संख्येने धरणे सत्याग्रह आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे व कृती समितीने केले आहे.

## इंडियन डेंटल असोसिएशन लातूरची डेंटल झेनित कार्यशाळा संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** इंडियन डेंटल असोसिएशनच्या लातूर शाखेच्या वतीने रविवारी कार्नीवल रिसॉर्ट लातूर येथे ९ वे महाराष्ट्र राज्य झोनल कॉन्फरन्स लातूर डेंटल झेनित कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेला अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली होती.

या कार्यशाळेसाठी सोलापूर, कोल्हापूर, धाराशीव, नांदेड, अमरावती, परभणी आणि हिंगोली येथुन दंतवैद्यक उपस्थीत होते. या कार्यशाळेला ३०० हुन अधिक डॉ. क्टर तसेच ३० पदव्युत्तर विद्यार्थी सहभाग नोंदवला होता. या कार्यक्रमामधे पहिले व्याख्यान डॉ. उदय पवार (कोल्हापूर) यांचे रुट कॅनालवरील त्यांनी निर्माण केलेलं नविन तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन केलं. या तंत्रज्ञानाने रुट कॅनाल उपचार खुपच सुलभ होतील असं सांगितलं. दुसरे स्पीकर डॉ. मनिष अग्रवाल (मुंबई) यांनी त्यांच्या व्याख्यानामधे सगळे दात किडुन अथवा झिजून गेल्यानंतर त्यावर फुल माउथ रिहॅबीलीटेशन करण्याच्या नवनविन पद्धती वर प्रकाश टाकला.

तिसरे व्याख्यान डॉ. मैत्रीश्व व्यास (नागपूर) यांचे होते. त्यांनी दंत उपचारपुर्वी व नंतर फोटो कसे काढायचे आणि त्यांची जपणुक कशी करायची यावर मार्गदर्शन केले. चौथे व्याख्यान डॉ. तृप्ती अग्रवाल (छत्रपती संभाजीनगर) यांचे होते. त्यांनी तुटलेल्या किंवा किडलेल्या दातांवर सौंदर्यवर्धक लॅमीनेटस व विनीअर कसे असावेत याचे वैज्ञानिक मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरवात राष्ट्रगानाने झाली. या प्रसंगी प्रमुख पाहुणे महाराष्ट्र दंत असोसिएशन चे अध्यक्ष डॉ. राजेश गोंधलेकर, यांची उपस्थिती होती.

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

### जाग ..

आत्ताचं जन समस्या
कशी दिसे जागोजाग
कुंभकर्णा सांगा सत्य
बुवाकशी आली जाग

निवडणूका उर्जा भरा
करा सुरु भाभम् भाग
आळस झटके तयारी
कार्यक्षम हरेक प्रभाग

आदेश ये लागा कामा
सतर्क आयटी विभाग
लग्न मुंजी सोहळ्यांत
समस्त जागी सहभाग

गाडगे धरा अंत्ययात्रेत
काबीज करा अग्रभाग
नेता कधी दिसत नाही
जन मानसां अति राग

सणवार येई पाठोपाठ
दाखवत फिराअनुराग
आंदोलने मोर्चा काढा
वेळीकरावा अन्नत्याग

पुनश्च जर हरलोचुकून
राहणारं नसे आगमाग
वेळी पकडे मासेआता
टाकून ठेवले आडपाग

हजेरीलावती कार्यकर्ते
तपासूनपहावे कॅटलॉग
जिंकल्यावर शांतपुन्हा
चिडी चिप जागो जाग

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## सोलापूर विभागात पहिली कवच चाचणी यशस्वी

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेत १४.०९.२०२५ रोजी सोलापूर विभागात पहिली कवच चाचणी यशस्वीरित्या पार पडली. त्याचबरोबर मध्य रेल्वेतील पहिले कवच प्रशिक्षण केंद्र सुरु झाले

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, श्री धर्म वीर मीना यांनी १४.०९.२०२५ रोजी सोलापूर विभागात स्वदेशी कवच प्रणालीच्या यशस्वी लोको चाचण्यांचे नेतृत्व केले.

सोलापूर विभागातील धवळस ते भाळवणी या २६ किमीच्या रेल्वे मार्गिकेवर पार पाडलेली ही यशस्वी चाचणी मध्य रेल्वेवरील पहिली कवच चाचणी असून रेल्वे संरक्षेत वाढ करून सुरक्षित गाडीसंचालन सुनिश्चित करण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

श्री मनिंदर सिंग उप्पल, प्रधान मुख्य सिग्नल व दूरसंचार अभियंता, मध्य रेल्वे; डॉ. सुजीत मिश्रा, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, सोलापूर विभाग तसेच मुख्यालय व सोलापूर विभागातील इतर वरिष्ठ अधिकारी देखील या चाचणीदरम्यान उपस्थित होते.

लोको चाचण्यांदरम्यान, कवच सिस्टीमच्या महत्त्वाच्या संरक्षा वैशिष्ट्यांची चाचणी घेण्यात आली, ज्यात हे समाविष्ट आहे:

स्टॉप सिग्नलवर एसपीएडी (सिग्नल पास ट डेंजर) चाचणी

ब्लॉक सेक्शन एसओएस (आपत्कालीन) जनरेशन

स्टेशन मास्टर एसओएस (आपत्कालीन) जनरेशन

टर्नआउट्सवर ओव्हरस्पीड प्रतिबंध.

कुर्डुवाडी येथील मध्य रेल्वेचे पहिले कवच सिम्युलेशन लॅब व प्रशिक्षण केंद्र नवीन ऋ-ढ सेटअप सह



कार्यान्वित करण्यात आले, ज्यामुळे कवच आणि भविष्यातील तंत्रज्ञानासाठी संपूर्ण परिसंस्था तयार करून प्रगत सुरक्षा नियमांचे काटेकोर प्रशिक्षण व अंमलबजावणी यासाठीची बांधिलकी दृढ झाली.

या प्रसंगी बोलताना श्री धर्म वीर मीना यांनी या यशाचे महत्त्व अधोरेखित केले: सोलापूर विभागात 'कवच'ची यशस्वी चाचणी ही या स्वदेशी संरक्षा प्रणालीच्या अंमलबजावणीतील एक महत्त्वाचा क्षण आहे. हे प्रवाशांची संरक्षा आणि कार्यक्षमतेची उच्च पातळी सुनिश्चित करण्यावर भारतीय रेल्वेचे अढळ लक्ष दर्शवते.

मध्य रेल्वेमध्ये कवच अंमलबजावणीसाठीची टेंडर ३०.३.२०२५ रोजी देण्यात आली आणि सोलापूर विभागात ६ महिन्यांपेक्षा कमी कालावधीत लोको चाचण्या यशस्वीरित्या पार पडणे अत्यंत कौतुकास्पद आहे.

यशस्वी चाचणीसाठी सोलापूर विभागाने समर्पित प्रयत्न केले आहेत ज्याचे सर्वत्र कौतुक झाले आहे.

श्री मीना यांनी कुर्डुवाडी येथे सुधारित लोको पायलट व ट्रेन मॅनेजर रनिंग रूम (उन्नत सुविधा सहित), अल्ट्रा सोनिक फ्लॉलेस डिटेक्शन इमारत आणि सुधारित गँग हट यांचे निरीक्षण केले.

कवच प्रणाली ही भारतीय रेल्वेची प्रवासी सुरक्षेला प्राधान्य देणारी एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. ही स्वदेशी विकसित ऑटोमॅटिक ट्रेन प्रोटेक्शन प्रणाली असून, सिग्नल पासिंग ट डेंजर, अतिवेग आणि टक्कर यांना प्रतिबंध घालून रेल्वेची संरक्षा वाढवण्यासाठी तयार करण्यात आली आहे. ही प्रणाली स्थानकातील उपकरणे आणि गाडीत बसवलेल्या युनिट्स यांच्यात रेडिओ लिंकद्वारे सिग्नलची माहिती आणि लोकोमोटिव्हचे स्थान यांचा रिअल-टाइम आदानप्रदान करते. प्राप्त झालेल्या या माहितीचे प्रक्रिया करून ती मूव्हमेंट ऑथॉरिटी आणि वेगमर्यादा अंमलात आणते, ज्यामुळे रेल्वे परीचालन अधिक सुरक्षित व कार्यक्षम होते.

मध्य रेल्वे 'कवच'च्या अंमलबजावणीसाठी युद्धपातळीवर काम करत आहे. संपूर्ण झोनल नेटवर्कसाठी कवचच्या अंमलबजावणीसाठी टेंडर मागणी करणारी पहिली रेल्वे असल्याचा मान मध्य रेल्वेला मिळाला आहे.

महाव्यवस्थापकांनी २५.०८.२०२५ रोजी मुंबई विभागातील इलेक्ट्रिक लोको शेड, कल्याण येथे कवच प्रणालीने सुसज्ज ५० व्या लोकोमोटिव्हला हिरवा झेंडा दाखवून रवाना केली. हे रेल्वे संरक्षा सुधारण्यात एक महत्त्वपूर्ण टप्पा असून, सुरक्षित, विश्वासार्ह आणि कार्यक्षम रेल्वे संचालनासाठी मध्य रेल्वेच्या प्रगत तंत्रज्ञान स्वीकारण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक ठळक पाऊल ठरले.

भारतीय रेल्वे संरक्षा आणि स्वयंचलन वाढवण्याच्या आपल्या बांधिलकीचा भाग म्हणून कवच प्रणाली मिशन मोड मध्ये अंमलात आणत आहे. पहिल्या टप्प्यात मध्य रेल्वेच्या ७३० लोकोमोटिव्हमध्ये कवच बसवण्याची रेल्वे बोर्डाने मंजुरी दिली असून, मध्य रेल्वेच्या सर्व लोको शेडमध्ये फिटमेंटचे काम प्रगत अवस्थेत आहे. त्यामुळे सर्व लोकोमोटिव्ह अखेरीस या प्रगत सुरक्षा प्रणालीने सुसज्ज होतील.

महाव्यवस्थापकांनी ०४.०९.२०२५ रोजी भुसावळ विभागातील मध्य रेल्वेचे पहिले अत्याधुनिक एकत्रित कवच नियंत्रण केंद्र यांचे निरीक्षण देखील केले.

ही आधुनिक सुविधा भुसावळ विभागातील १३४ ठिकाणांवर कवच प्रणालीचे निरीक्षण व देखरेख करण्याचे मध्यवर्ती केंद्र आहे. प्रगत तंत्रज्ञान व समर्पित नेटवर्क मॉनिटरिंग सिस्टम ने सुसज्ज असलेले हे केंद्र रिअल-टाइम देखरेख, संचालन कार्यक्षमता वाढवणे आणि रेल्वे संचालनातील संरक्षा उपाय मजबूत करणे यास सक्षम करते.

प्रत्येक यशासोबत, संरक्षा आणि संचालन कार्यक्षमतेच्या मजबुतीच्या सातत्यपूर्ण प्रवासात, मध्य रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षितता आणि सोयीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान स्वीकारणे व अंमलात आणणे यामध्ये अग्रगण्य ठरले आहे.

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट प्रिंटिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade	Mo. 9422472502,	RNI 47034/64,	POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६